!!श्री!!

सार्वजनिक समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून जाण्याचा प्रसंग तुमच्यावर कधी आलाय? एखादे महाविद्यालय किंवा एखादी सामाजिक कार्य करणारी संस्था अगदी गेला बाजार एखाद्या ज्ञातीच्या किंवा अमुक नाहीतर तमुक आडनाव असलेल्या कुलोत्पन्नांचा फोफावलेला वटवृक्ष आणि त्याची ऊहापोह मांडणारा एखादा समारंभ या असल्या ठिकाणी प्रमुख पाहुणे म्हणून कधी जायचा बिकट प्रसंग तुमच्यावर ओढवलाय? जर अजून पर्यंत आला नसेल तर तुम्ही सुदैवी आहात. दुर्दैवाने आमच्या व्यवसायाचा सध्या तो एक अविभाज्य घटक बनलेला आहे. गावोगावी हे असले समारंभ सातत्याने घडत असतात. सुदैवाने या प्रचंड संख्येने फोफावलेल्या समारंभांना, असंख्य मालिकांत काम करणारे अगणित कलाकार सध्या उपलब्ध झालेले आहेत त्या सगळ्यांना ‘सेलेब्रिटी’ या शब्दात गुंडाळलं जातं. शिवाय ‘मागणी तसा पुरवठा’ या अर्थशास्त्रीय व्याख्येमुळे हे समारंभ सेलिब्रिटींना बोलावून अत्यंत जोरात सुरू आहेत. या असल्या कार्याला उपस्थित राहणा-या कलावंतांना मानधनाचे लड्डूपासून रोड पर्यंत सगळ्या आकारात बसणारे एक पाकीट दिले जाते. त्यामुळे कुणालाही त्याबद्दल तक्रार अथवा कुरकुर करता येत नाही. त्यातून वयपरत्वे  आता जाणते या गटात अजाणतेपणे किंवा मुद्दामून माझा समावेश होतो त्यामुळे  मला येणारी आमंत्रणं जरा वेगळ्या स्वरूपाची असतात. स्थूलमानाने सांगायचं म्हटलं (स्थूल हा शब्द माझ्या तब्येतीला धरून नाही याची नम्र नॲद घ्यावी) तर  बरेच वेळा वार्षिक समारंभांना पारितोषिके प्रदान करायला मला बोलावणे येते. (प्रदान हा शब्द माझा नाही निमंत्रण पत्रिकेत तो तसा छापलेला असतो) या अशा ओढवणा-या किंवा ओढवून घेतलेल्या समारंभाच्या काही ठरलेल्या पाय-या आहेत.

प्रथमतः साधारण महिना-पंधरा दिवस अत्यंत कमावलेल्या कृत्रिम आवाजात एक फोन येतो. कमावलेला आवाज  समारंभ किती  दिमाखदार रीतीने साजरा होतो याबद्दल सूतोवाच करतो. शिवाय आमंत्रित ठिकाणच्या सांस्कृतिक भव्यतेची,सामाजिक परंपरेची जाणीव आपल्याला करून दिली जाते. नंतर कार्यक्रमासाठी आल्यास,आपली चरण कमले आमच्या शहराला लागली तर, प्रभू रामचंद्रांचे चरण चौदा वर्षांच्या वनवासानंतर  पुनश्चः अयोध्येच्या भूमीवर पडले तेव्हा जसा आनंद अयोध्यावासियांना झाला होता तसाच आनंद आमच्या इथल्या रहिवाशांना त्या विविक्षित दिवशी होणार आहे,असे फोनवर सांगितले जाते. फोन झाल्यावर मी माझी पावले  (तो चरणकमल म्हणाला होता, मी निदान पावले तरी म्हणतो. शंभर ठिकाणी जाऊन झिजून आलेल्या माझ्या पायांना पावले  म्हणणं म्हणजे कण्हेरीच्या फुलांना सोनचाफा म्हणण्यासारखं आहे) आरशात पाहतो. पावलांकडे बघतांना फोन करणा-या माणसाच्या गावात कशाला कमळ म्हणत असतील? हा प्रश्न मनात आल्याशिवाय रहात नाही.त्यामुळे कार्यक्रमाला जाताना मी  नेहमी आपली पावले दिसणार नाहीत असे बूट पायात  घालून जातो.खरं तर त्या पावलांना चरणकमले म्हणणा-या माणसाच्या संभाषणाची भूल पडून तिथे जायला मी तयार होतो. (का नाही जाणार? पैसे मिळणार असतात ना!) जाण्यायेण्याची व्यवस्था काय आणि कशी?याबद्दल एक गहन चर्चा पुढच्या तीनेक दिवसात रंगात येते. प्रवास रेल्वेचा असतो आणि त्यासाठी तिकीट आवश्यक असतं .नेमकं ते मिळत नसतं.आपल्याला वेटिंग २८ वगैरे असलेलं तिकीट पाठवलं जातं.त्याबद्दल पुढचा फोन आल्यावर फोन करणारी व्यक्ती आपली ‘आतमध्ये’ ओळख आहे

तेव्हा आयत्या वेळी तिकीट नक्की होईल असं ठासून सांगते. बरेच वेळेला ते होतेही, पण आत बसल्यावर त्या तिकिटाच्या परिस्थितीचा निश्चित अंदाज येईपर्यंत माझा जीव वरखाली होत असतो. शेवटी एकदा जाण्याचा दिवस किंवा रात्र उजाडते. (रात्र उजाडते हे थोडं चुकीचं आहे.रात्र मावळते असं लिहायला हवं होतं.असो! पुढच्या वेळी लक्षात ठेवलं पाहिजे) आता तिथल्या लोकांचे जणू काही मुंबईत आणि त्यांच्या शहरात  चोवीस तास दिवसच असतो अशा  प्रकारे कुठल्याही वेळी फोन येऊ लागतात.त्या ठिकाणावर उतरल्यानंतर कोण तुम्हाला आणायला येणार आहे हे वारंवार सांगितले जाते.स्टेशनवर हजारअॅची गर्दी असेल पासून ते सगळ्यात महाग वाद्यवृंद तिथे माझ्यासाठी स्वागतपर गीत गाणार आहे याची जाणीव करून दिली जाते.शेवटच्या क्षणी एक फोन येतो,त्यात तिथले कार्यक्रम काय असतील याची यादी ऐकवली जाते.मूळ कार्यक्रमाला जोडून अजून एक दोन कार्यक्रम त्यात कधीकधी सरकवलेले असतात.बहुधा  ते त्यांच्या कार्यक्रम संचालक मंडळांच्या आश्रयदात्यांच्या घरी किंवा दुकानबिकान अशा ठिकाणी सदिच्छा भेट अशा चॉकलेटला जसा रंगीबेरंगी कागद गुंडाळलेला असतो,तशा शब्दांनी अवगुंठित केलेले असतात.

ठरल्या दिवशी रात्रभर प्रवास करून जेव्हा पहाटे पहाटे मी त्या गावी जातो तेव्हा तिथे न्यायला येणा-या हजारअॅची गर्दी पंधरा-वीस वर आलेली असते.रेल्वेची शिट्टी हाच वाद्यवृंद समजून मी पुढे होतो ,कोणीतरी एक माणूस पुढे होऊन हातात एक केविलवाणा गुच्छ ठेवतो. मग त्या आलेल्या पंधरा माणसांची आपसात चर्चा होऊन एका गाडीत मी आणि भलत्याच गाडीत माझी बॅग अशी विभागणी होते.गाडीत बसल्यानंतर मांडीवर ठेवलेल्या गुच्छातून पाणी गळायला लागते. कारण गुच्छ आदल्या रात्रीच आणून फ्रिजमध्ये ठेवलेला असतो. गाडीत संबंधित संस्थेविषयी सगळी माहिती माझ्या कानात ओतली जाते.जीव चहाच्या एका कपासाठी कासावीस झालेला असतो.उतरायचे ठिकाण येता येत नाही आणि माहिती सांगणा-याची माहिती संपता संपत नाही. यदाकदाचित माहिती संपलीच तर तो माणूस स्वतःची माहिती सांगायला सुरुवात करतो. गाडी चालवणा-याची झालेली झोपमोड आणि त्यामुळे त्याला माझ्याबद्दल वाटणा-या नेमक्या भावना (त्या भावनेला तिरस्कार याहून बरा शब्द नाही.थोडासा कमी जहाल शब्द सुचला तर मला कळवा. पुढच्या वेळेला जाईन तेव्हा मन जरा हलकं होईल) त्याच्या डोळ्यातून नको तितक्या स्पष्टपणे दिसत रहातात,म्हणूनच वाटेत आडव्या येणा-या प्रत्येकाच्या आई विषयीच्या सद्भावना चालकाच्या शब्दातून व्यक्त होत असतात. शेवटी एकदाचे हॉटेल येते. मी पट्कन जाऊन आपल्या खोलीत उरलेली झोप घ्यायचा विचार करत असतो, पण आलेल्या लोकांचा उत्साह उफाड्याचा असतो. माझ्या आधी यापूर्वी आलेल्या प्रमुख पाहुण्यांची यादी ऐकवली जाते, ती ऐकताना त्यांच्या तुलनेत यंदा माझ्या रूपाने त्यांना थोडा कमअस्सल पाहुणा लाभलाय हे का कुणास ठाऊक पण मला त्यांच्या बोलण्यातून दिसतंय असं मला सतत वाटत रहातं. सकाळी खायला काय मागवायचे याबद्दल त्यांच्यात चर्चा होते. माझे मत जाणून घ्यावेसे कुणालाच वाटत नाही.खूप चर्चेनंतर पोहेच मागवले जातात. खाणे उरकते आणि सगळे अचानक पांगतात. जाताना कार्यक्रमाला कधी जायचे आहे आणि कोण न्यायला येणार ते पुन्हा एकदा सांगितले जाते.जाता जाता “तुम्हाला अख्खा महाराष्ट्र ओळखतो साहेब!”असं फोनवर सांगणा-या माणसाचा  “थोडी तुमची माहिती मिळेल का?” हा प्रश्न पोह्याचा घास घशात अडकवून जातो. हल्ली काही वर्षं मी माहितीचा कागद  बरोबर घेऊनच  जातो.तो त्याच्या हातात ठेवतो. न वाचताच तो घड्या घालायची स्पर्धा असल्यासारखा त्या कागदाच्या अगणित

घडया घालून मागच्या खिशात कअॅबतो.माझी तीस बत्तीस वर्षांची (चोख पैसे घेऊन केलेली) रंगभूमीची सेवा पुढच्या खिशात ठेवायच्याही लायकीची नाही की काय? हा विचार मनातून जाता जात नाही.मी आंघोळ वगैरे उरकून घेतो.एखादा चहा अजून प्यावा आणि स्थानिक वर्तमानपत्रे चाळावी आणि अलगद थोडी झोप काढावी असा बेत आखतो.तितक्यात खोलीतला फोन वाजतो.शहर मोठे असल्यास तिथल्या एफ.एम.चॅनेलच्या माणसाला “आपली चॅनेल विजीट” हवी असते मात्र हे सगळं त्यांना त्यांच्या वेळापत्रकानुसार हवे असते.म्हणजे झोपेचे खोबरे ठरलेले.मला दुपारच्या जागरणाचा अंमळ त्रास होतो म्हणून मी नकार द्यायचा प्रयत्न करतो.तरी ते गाडी पाठवतो म्हणतात.तुम्ही या व्यवसायाकडे कसे आलात? तुमचे आदर्श कोण? भूमिकेत झोकून देता का? तरुणांना काय मार्गदर्शन कराल? या छापाची ती मुलाखत असते आणि ती रात्री ऐकवली जाणार असते.त्या रात्री जेव्हा मी न दिसणा-या तरुणांना मार्गदर्शन करत असतो तेव्हा प्रत्यक्षात तरुणवर्ग न सांगण्याच्या ठिकाणी मजा करण्यात मग्न असतो.अनेक वेळेला माझे बहुमोल मार्गदर्शन वाया गेलेले आहे. त्या सगळ्या भेटींचे सोपस्कार उरकेपर्यंत दुपार उलटून गेलेली असते.”हॉटेलवर जेवन घेऊन घ्या” अशा सकाळी दिल्या गेलेल्या सूचनेनुसार मी “जेवन घेऊन घेतो”. कार्यक्रम साडेसातचा असल्यामुळे निदान दोन तास विश्रांती घ्यावी असं ठरवून “इथे का आलो आणि कसा परत जाणार?” या विवंचनेत उरलेला वेळ काढतो.तितक्यात सकाळच्या लोकांपैकी काही व्यक्ती हजर होतात.त्यांच्या हातात एक दहशत वाटावी इतक्या जाडीचा एक अल्बम असतो.मागल्या काही वर्षांत ज्यांची चरणकमले त्या शहराला लागून गेली त्या मान्यवरांचे फोटो त्यात असतात. प्रत्येकाच्या डोळ्यात अनावर झालेली झोप त्यात लख्ख दिसून येते. इतरही काही यावेळी हजर असतात.त्यांची ओळख करून दिली जाते. ठिबक सिंचन पाईपचा मालक,कुठल्यातरी जिल्हा बँकेचा पदाधिकारी,एखादा शोरूमचा मालक (होणा-या  कार्यक्रमाला त्याचे पैसे लागलेले असतात) असे कोणीतरी.आता राजकीय समीकरणे बदलली आहेत पण पूर्वी यातले सगळे श्री.शरद पवार यांचे उजवे हात असायचे. त्यांना उजवे हात तरी किती आहेत?

मग पुन्हा एकदा चहापान होते आणि आम्ही सगळे कार्यक्रमाच्या ठिकाणी जायला निघतो.जाताना त्या नवीन व्यक्तींपैकी कुणाच्या तरी गाडीतून जायची सोय झालेली असते,जाण्याच्या प्रवासात ती व्यक्ती “आपले” या शहरात काय काय मालकीचे आहे याची माहिती पुरवत असतो. “आपले” असं म्हणून तो मलाही त्याच्या आर्थिक समृद्धीत सामावून घेतो. मीही त्या काल्पनिक श्रीमंतीत काही काळ रममाण होऊन कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहोचतो.

यानंतर कार्यक्रम कसा पार पडला आणि माझे काय झाले याची उत्सुकता तुम्हाला असेल, पण आपलीच निर्भर्त्सना आपण किती करावी... नाही का? शिवाय तुमच्यावर असा प्रसंग ओढवला नसेल तर का तुमच्या सुखात मी मिठाचा खडा टाकावा?